# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | APRIL 2023 | No. 03


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

गीतशास्त्र : ११३ : १-९

१) परमेश्वराचे स्तवन करा. परमेश्वराच्या सेवकांनो, स्तवन करा, परमेश्वराच्या नामाचे स्तवन करा.

२) आतापासून सर्वकाळ परमेश्वराच्या नामाचा धन्यवाद होवो.

३) सूर्याच्या उगवतीपासून मावळतीपर्यंत परमेश्वराचे नाम स्तवनीय आहे.

४) परमेश्वर सर्व राष्ट्रांहून उन्नत आहे, त्याचे वैभव आकाशाहून उंच आहे.

५) परमेश्वर आमचा देव याच्यासारख्या कोण आहे? तो उच्च स्थळी सिंहासनारुढ आहे.

६) तो आकाश व पृथ्वी यांचे अवलोकन करण्यास लावतो.

७) तो दीनांस धुळींतून उठवितो, दरिद्र्यांस उकिरड्यावरून उचलितो.

८) आणि त्यांस अधिपतींच्या, आपल्या लोकांच्या अधिपतींच्या, पंक्तिस बसवितो.

९) तो वांझ स्त्रियेला गृहिणी करुन मुलांची आनंदी माता करितो. परमेश्वराचें स्तवन करा.

# खरे संजीवन ! REAL REVIVAL!

(पास्टर एस्. सॅम सेल्वा राज)

मी ख्रिस्तीजनांच्या मंडळात फार मोठ्या प्रमाणात वापरण्यात येत असलेल्या ‘संजीवन’ हा शब्द माझ्या बायबल मध्ये शोधण्याचा प्रयत्न केला; परंतु मला काही तो सापडला नाही. ‘संजीवन’ या शब्दाचा अभ्यास करणे हेच मुळात फार मोठे शिक्षण आहे. भारतात लोक आत्मिक सभांविषयी जेव्हा बोलतात, तेव्हा सर्वसाधारणपणे त्यांना सुवार्ता सभा, संजीवनाच्या सभा आणि महासभा म्हणण्यात येते. कांही देशांमध्ये अशा सभांना ‘संजीवन’ म्हणण्यात येते. आज मी जो संदेश देणार आहे, तो देव ‘शेवटच्या पर्जन्या’ सारखा जे पुनरुज्जीवन किंवा आत्मिक संजीवन घडवून आणतो त्याबद्दल.

पुनरुज्जीवन/संजीवन हा शब्द लॅटिन भाषेमधून घेण्यात आलेला आहे. इंग्रजीत त्याचा अर्थ ‘जागृति’ असा होतो. 'Vivo' म्हणजे, ‘दिलेले जीवन’ किंवा ‘जीवन पुन:प्राप्त होणे’ किंवा ‘जीवनात येणे’ याचा अर्थ मृत्युच्या दाढेतून कोणाला तरी ‘जीवन पुन’ प्राप्त होणे. ते मृताला जीवंत करणे नसून जागच्या जागी खिळलेल्या किंवा हालचाल करीत नसलेल्यामध्ये चेतना आणणे. व्यक्तिच्या हृदयावर आघात (हार्ट अटॅक) होतो. तेव्हा त्याच्या हृदयाचे स्पंदन थांबते; परंतु त्याला ताबडतोब वैद्यकीय उपचार दिले, कि त्याचे हृदय पुनरुज्जीवित होते. पुनरुजजीवनाच्या या पद्धतीस **संजीवन** म्हणतात.

मी स्वर्गवासी रेव्ह. एस. देवदासन यांच्या ‘हेरॉल्ड ऑफ हिज कमिंग’ या सेवाकार्याचे फळ होतो. आता तुम्ही ऐकले की मी ‘हेरॉल्ड ॉफ हिज कमिंग’चे फळ किंवा उत्पादन

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल — पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता    रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**CHIEF EDITOR**

Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**

Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**

Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**CORE LEADERS**

Bro. K. Puratchivendan
Dr. Rabinder Boaz, M.S.
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah

**E.mail ID**

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**

Echo of His Call


**"...तूं देशांच्या उच्च स्थलाचें जयोस्ताहाने आक्रमण करिशील असे मी करीन; अणि तुझ पिता याकोब याच्या वतनाचा तुला उपभोग घेऊ देईन..."** (यशया ५८ : १४)

प्रभु मधील अति प्रियांनो,

पुष्कळ चांगल्या गोष्टि तुमच्या कडे येतील! उल्हासीत रहा!!

जगातील सर्व देशांत, देवाच्या सुवार्तेचे कार्य वेगाने कार्य करीत आहे; केवळ आम्हीच सुर्वाता प्रसार कार्य करीत नाही. पुष्कळशा मंडळ्या आणि ख्रिस्ती संस्था त्यांच्या देवाच्या सेवकांना त्यांच्या त्यांच्या सेवेच्या क्षेत्रात लोकांची पापाच्या बंधनातून सुटका करण्याकरिता आणि आजारातून व दारिद्र्यातून मुक्त करण्याकरिता पाठवीत आहेत. आपण या सर्व मंडळ्यां करिता, संस्थाकरिता आणि देवाच्या सेवकांकरिता आग्रहाने प्रार्थना केली पाहिजे. त्याशिवाय त्यांना होईल तितका आधार दिला पाहिजे. आपण आपल्या मंडळीची तत्वे आणि सर्व भेदभाव विसरुन व नष्टकरून एकत्रीतपणे एक सैन्य म्हणून उभे राहिले पाहिजे.



नव्या चर्चचे समर्पण

आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**च्या जुना विद्यार्थी जे. राजामणी आणि त्याची पत्नी आर. विमल या दोघांना २६ जानेरी २०२३ रोजी पाळकीय दिक्षा देऊन त्यांची पालवेरकडू या ठीकाणी पास्टर म्हणून नेमणूक करण्यात आली. ती भक्ति अतिशय आशीर्वादीत झाली होती. तेथील बांधण्यात आलेले प्रार्थना मंदीर व पाळकीय निवासस्थान देवानें आशीर्वादीत करावे यासाठी प्रार्थना करुया. भारतातील खेडेगावात असलेल्या सर्व मंडळ्याची वाढ हेऊन त्या उत्कर्ष पावल्या पाहिजे. आपल्याला ठाऊक आहे की भारतात सात लाख खेडी आहेत आपल्याला कसेहि करुन शुभवर्तमान न पोहचलेल्या ठीकाणी ते घेऊन जावयाचे आहे.

**एको ऑफ हिज कॉल कुटुंबाची जबाबदारी :**



एको ऑफ हीज कॉलचे कुटुंब

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Media Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development



*Servant of God engaged in evangelism*

देवाचे सेवक, जे लोकांना नाशापासून सोडवून योग्य मार्गावर आणण्याकरिता प्रामाणिकपणे कार्य करित आहेत त्यांना अतिशय त्रास सहन करावा लागत आहे. आपल्याला त्यांच्या मुलभूत गरजा भागविल्या पाहिजेत. सैतान त्यांच्या शारिरीक आणि आत्म्यावर हल्ला करीत आहे. तुम्हाला ठाऊक असलेल्या अशा सेवकांना, तुमच्या पैशांद्वारे आणि प्रत्यक्षात आधार देऊन मदत करा. देवाच्या अनेक श्रीमंत अशा सेवकांना, त्यांना सुरुवातीस झालेल्या पाचारणाचा आणि दर्शनाचा विसर पडला आहे. ते सध्या स्वत:च्याच सुखसोईत वाढ करण्यात आणि मालमत्ता खरेदी करण्यात व्यस्त आहेत. सेवेच्या नावाखाली ते आवश्यक नसताना देखील मोठ्या इमारती बांधत आहेत आणि स्वत:च्या मार्गात गोंधळून गेले आहेत. कृपया अशा अनेकांना मदत न करता जे आत्मे जिंकण्याकरिता श्रम करीत आहेत अशा सेवकांना मदत करा - आधार द्या. अशा सेवकांना शोधा आणि त्यांना त्यांच्या प्रयत्नात आधार द्या. देव तुम्हाला आशीर्वाद देईल.

असे अनेक देवाचे सेवक आहेत, जे ख्रिस्ताशिवाय नरकाकडे जात असलेले लाखो-लाखो लोक पहात आहेत. त्यांच्यापैकी काही सेवक ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनाविषयी संदेश देतात आणि ते कोणत्याहि वेळी याविषयी निर्देशीत आहेत. परंतु त्यांच्याकडे करोडो रुपये खर्च करून मोठ्या इमारती बांधण्यासाठी पुष्कळ वर्षाकरिता योजना आहेत. त्याची आवश्यकता आहे काय? ही कपटी फसवेगीरी नाही कां? मंडळीचे पुढारी अशा गोष्टी करु शकतात कां? कृपया यावर विचार करा आणि आत्म्यांविषयीचे ओझे घेऊन प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या सेवकांना पाठींबा द्या. आधार द्या.

सुवार्तिक-उपदेशक ज्यांच्याकडे सायकल देखील नाही. छोट्या मंडळ्या ज्यांचा प्रार्थना गृहाला योग्य असे छप्पर नाही; बसण्यासाठी व्यवस्थित जमीन नाही; आणि जे सेवक देवाकडे त्यांना त्याचे पुढील भोजन मिळावे अशा अपेक्षेने पाहत आहेत अशांना शोधून काढणे शहाणपणा ठरेल. दुसऱ्यांद्वारे आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी.

काही लोक त्यांच्या व्यवसाया पासून शिकलेल्या फसव्या योजना तयार करतात. त्यांनी त्यांच्या स्वत:चा धंदा असल्याप्रमाणे, त्यांच्या उत्पादनाच्या विक्रीत देवाला आणि त्याच्या सेवेला देखील त्यासोबत जोडतात. अशा लोकांची ओळख करुन घ्या व शहाणपणाची कृति करा. आम्ही तुमच्या करिता निश्चितच प्रार्थना करु.

आम्ही आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**च्या दर्जात अधीक सुधारणा करुन अधीक देवाच्या सेवकांना प्रशिक्षित करण्याचा आणि बी.टी.एच्. डीग्री कार्यक्रम सुरू करण्याचे ठरविले आहे. सुरुवात म्हणऊन बी.टि.एच्. अभ्यासक्रम ऑन लाईन सुरू करणार आहोत. आम्ही प्रेमानें तुम्हाला विनंती करीत आहोत की, तुमच्या मंडळ्यांमध्ये, आणि ज्यांना तुम्ही ओळखता अशांना याविषयी सांगून अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याकरिता पाठवा. या विषयी तुमच्या सुचना आणि अभिप्रायांची आम्ही अपेक्षा करीत आहोत. अधिक माहिती करिता आमच्याशी संपर्क साधा देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन... )

होतो. आपण 'संजीवन' किंवा उत्पादन हे पवित्र आत्म्याचे फळ आहे किंवा ते पवित्र आत्म्याद्वारे दिलेले आहे. पवित्रआत्मा जेथे-जेथे कार्य करितो, तेथे आपण संजीवन पाहू शकतो. ही मानवी कृति नाही; तर ते देवाची कृति आहे अधार्मिकांमध्ये संजीवन घडत नाही.

संजीवन दुबळ्या-कमकुवत संताला उत्तेजीत करुन परत देवासमीप आणते. अत्मिक पतन झालेल्यांना शुद्धिवर आणून त्यांना परत मार्गावर आणते. संजीवन समाजात देवाच्या उपस्थितीचे वर्णन करण्यास आणि देवराज्याविषयीचे अज्ञान दूर करण्यास आणि अद्भुत जागृती निर्माण करते.

झंझावाती संजीवना करिता नेहमी करितो ती प्रार्थना पुरेशी नाही; तर आपल्याला काहीतरी असामान्य अशी गरज आहे. खरे संजीवन आधुनिक वाद्यांच्या द्वारे आणता येत नाही; किंवा पुष्कळसा मोठा आवाज करून किंवा नवीन प्रकारची नृत्ये करून आणू शकत नाही. ते आपल्या गुडघे टेकल्याने येते. चेन्नाई शहर फार मोठ्या संख्येने प्रार्थना मंदिरांनी आशीर्वादीत आहे. तरी देखील काही विभागात मंदिरे/मंडळ्या नाहीत. आमच्या मुख्य मंडळीचा विभाग हा त्यापैकी एक होता. देवाच्या अनेक सेवकांनी असा निष्कर्ष काढला की, प्रभुच्या सुवार्तेचा प्रसार या विभागात करणे शक्य होणार नाही. परंतु देवाने मला या नाकारलेल्या किंवा नापसंद केलेल्या विभागात त्याचे शुभवर्तमान घेऊन जाण्याचे ओझे दिले. याची परिपूर्ती होण्यासाठी करीता पुष्कळ प्रार्थना आणि वाट पाहत रहाण्याची गरज होती. सरतेशेवटि प्रभुने संजीवन घडविले. मोठ्या संख्येने नाशाकडे जात असलेल्या लोकांची देवाने त्यांच्या शुभवर्तमानाद्वारे भेट घेतली. मंडळी अस्तीत्वात आली. अनेकांचा देव जो बाप, देव जो पुत्र; आणि देव जे पवित्र आत्मा याच्या नामात बाप्तिस्मा झाला व

त्यांची मंडळीत भर पडली.

या संजीवनामुळे आमच्या विभागाच्या जवळील पॅरागॉन सिनेमा गृह, न्यु एलफीस्टन सिनेमा गृह, वेलींग्टन सिनेमा गृह, स्टार सिनेमा गृह इत्यादी, जी दुष्टतेची उगमस्थाने होती ती सर्व पाडण्यात आली; आणि त्यांच्या जागेत दुसऱ्या इमारती उभ्या राहिल्या. अनेकजण, जे वाईट सवईत, हिंसक कृत्ये करणयत आणि गुंगी आणणारी औषधे सेवन करण्यात, तिरस्कारणीय कृत्ये करण्यात गुंतलेली होती - बंधनात होती, त्यांच्या हृदयात परिवर्तन झाले, त्यांनी जीवंत देवाला मिठी मारिली, आमच्या मंडळीत सामील झाले आणि सामर्थ्यशाली देवाचे साक्षीदार झाले.

आता, आपल्याला विचार करावयाचा आहे कि हे संजीवन तात्पुरते आहे कां? किंवा कायम स्वरुपी आहे? ते टिकवून कसे ठेवता येईल?

या जगात अशा प्रकारची संजीवने अनेक देशांत घडली. उदा. स्कॉटलँड आणि कोरीया. जॉन नॉक्स या देवाच्या सेवकाने स्कॉटलॅन्ड मध्ये संजीवन घडावे यासाठी आग्रहाने प्रार्थना केल्या. देवाने मोठ्या प्रमाणात संजीवन पाठविले. परिणामी फार मोठ्या संख्येने लोकांनी प्रभु येशू ख्रिस्ताचा त्यांचा वैयक्तिक उद्धारकर्ता म्हणून स्विकारीले. राष्ट्राने प्रगती केली. तेथे आर्थिक भरभराट झाली. मोठ्या संख्येने प्रार्थना मंदिरे बांधण्यात आली. सर्व ठीकाणी प्रार्थना सभा आणि आत्मिक कार्यक्रम होवू लागले. फार मोठ्या संख्येने तरुण-तरुणींनी पश्चाताप करुन ते देवाच्या कळपात सामील झाले, आपले जगीक सुख चैनीचे जीवन त्यागून मिशनरी म्हणून अनेक देशात सुवार्ता गाजविण्यास देशांबाहेर पडले. यामुळे भारतात आणि इतर अनेक देशांत मोठ्या संख्येने प्रार्थना मंदिरे, शाळा, दवाखाने बांधली गेली. परंतु आज या स्कॉटलॅण्ड देशाची काय अवस्था आहे?

या देशाला मी हल्ली भेट दिली, त्यावेळी एक बातमी माझी वाट पाहत आहे हे पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. ख्रिस्ती शिक्षण आचरणाऱ्यांची संख्या अतिशय कमी आहे. अनेक लोक ख्रिस्त विरहीत जीवन जगत आहेत. अनेक उंच अशी प्रार्थना मंदिरे विकण्यात आली असून ती मूर्तिपुजा, व्यापारी केंद्र, तिरस्करणीय वस्तू विक्री करण्यासाठी, मद्यविक्रीची दुकाने, नृत्य गृह, नाट्य गृह, अश्लील चित्रपट मुद्रीत करण्याची केंद्रे आणि नमुद करता न येणाऱ्या गोष्टिंची केंद्रे चालविण्यात येत आहेत. खेदाची लाजीरवाणी बाब म्हणजे या इमारतींवर आज देखील क्रुसाचे चिन्ह आढळते!

या देशात देवाच्या एका सेवकाने मला एका मोठ्या सभागृहात देवाचे वचन देण्याकरीता आमंत्रीत केले. आमंत्रण देत असताना ते मला म्हणाले, "पास्टर, या लोकांना येशू ख्रिस्ता विषयी किंवा ख्रिस्ती धर्माविषयी काही सुद्धा माहिती नाही. जेव्हा तुमचा संदेश हा आपल्या जीवंत देवाची-ख्रिस्त येशूची ओळख करुन देणारा असावा!" ते ऐकून गोंधळे जरुर झाला, तरी मी येशू ख्रिस्ता विषयीच्या पायाभूत सत्याविषयी संदेश दिला, जेव्हा उपस्थितीपैकी बहुसंख्य लोकांनी पश्चाताप केला आणि अश्रु ढाळीत पुढे येऊन येशू ख्रिस्ताचा त्यांचा वैयक्तिक तारणारा-उद्धारक म्हणून स्विकार केला! ते अतिशय अद्भूत असे दृष्य होते.

त्यांच्यां पतनाचे काय कारण होते? त्यांनी त्यांची पहिली प्रीती गमावली. जगीक शिक्षण, आर्थिक भरभराट, मौजेचे जीवन मुंगी आणणाऱ्या औषधांचे सेवन इत्यादी कारणांमुळे त्याची मने बोथट किंवा आडमूठी झाली आणि प्रार्थनामय जीवन परकीय असे समजु लागले शिवाय त्यांनी त्यांच्या जीवनातून पवित्रता वर्ज केली.

याच्या उलट ज्या कोरीयादेशाने संजीवन अनुभवले त्याकडे पाहा.

कोरीया देशाची आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक स्थिती ढासाळलेली असताना, देवाने पॉल योगी-चो या व्यक्तिला तयार केले. देवाने त्याच्या प्रार्थनेचे उत्तर दिले व कोरीया देशात फार मोठे संजीवन घडवून आणले. या संजीवनाचा परिणाम देशाची जागतीक स्थरावर फार मोठ्या आर्थिक आणि शैक्षणीक क्षेत्रात वाढ झाली. देवाच्या लोकांनी देवाच्या सेवकाने प्रार्थनेला आणि

(...पान ६ वर)


## नहेम्याह बाइबल कॉलेज
### रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

**सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान**

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल

डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

**योग्यता 10 वी या अधिक**

**जल्दी करें!**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ एप्रिल २०२३ ते १८ मे २०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

| | |
|---|---|
| १९ एप्रिल | :आमच्या सर्व प्रार्थना ागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार आणि त्यांच्या कुटुंबा वरील असलेल्या दयेबद्दल. |
| २० एप्रिल | : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये छापून सर्व मिशन क्षेत्रांकडे पाठविण्यात येत असलेली प्रकाशने देव आशीर्वादीत करीत आहे. |
| २१ एप्रिल | : ओसबरी संजीवन द्वारे युएसए वर आशीर्वादा करीता. |
| २२ एप्रिल | : आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांचा सेवाकार्या संबंधीत दौरा आशीर्वादीत केला. |
| २३ एप्रिल | : वरीष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज, यांच्या द्वारे **यू ट्युबरील पांच मिनिटांच्या संदेशा द्वारे** साक्षा तयार होत आहे. |
| २४ एप्रिल | : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रिक्युलेशन स्कुल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज**च्या सर्व कार्यक्रमांबद्दल. |
| २५ एप्रिल | : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**च्या १०वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी रित्या अभ्यासक्रम पूर्ण केल्या बद्दल. |
| २६ एप्रिल | : आमच्या संस्थेकरीता पात्र - योग्य उमेदवार निवड करता आले. |
| २७ एप्रिल | :आमच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता. |
| २८ एप्रिल | : **नहेम्या बायबल** द्वारे नविन ऑन लाईन बी.टीच. अभ्यासक्रम सुरू करून आशीर्वादीत केले. |
| २९ एप्रिल | : आमचे **बायबलकोर** आणि **थियॉलॉजीकल अभ्यास** (टपाला द्वारे करण्यात येत असलेला) आशीर्वादीत केला. |
| ३० एप्रिल | : आमचा सेवा कार्यासंबंधीत दौरा आशीर्वादीत झाला. |
| ०१ मे | :आमच्या संस्थेतील सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबाचे रक्षण केले. |
| ०२ मे | : आमचे वरिष्ठ पाळक एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या सर्व कुटुंबाला दुष्ट शक्तिपासून सुरक्षित ठेविले. |
| ०३ मे | : आमच्या **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कुल**चा रौप्य वर्धापन दिन सोहळा आशीर्वादित झाला. |

## ✝ प्रार्थने करीत ाा मुद्दे

| | |
|---|---|
| ०४ मे | : संपूर्ण जगात जे रुग्ण विशिष्ट कालावधीच्या आजाराने दवाखान्यात पुष्कळ दिवसांपासूनउपचार घेत आहेत. |
| ०५ मे | : **एको ऑफ हिज कॉ** यू ट्युब चॅनलकरिता नवीन वर्णीदार मिळावेत. |
| ०६ मे | : आमच्या उत्तर भारतातील मिशनरी आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता. |
| ०७ मे | : पाळक आणि मिशनऱ्यां विरुद्ध होत असलेला छळ बंद व्हावा. |
| ०८ मे | : सर्व दुष्ट शक्तिपासून आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षिततेचे जीवन जगता यावे. |
| ०९ मे | : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या ३ जून रोजी होणाऱ्या दिक्षांत समारंभाकरिता. |
| १० मे | : सर्व मंडळ्यांनी आत्मे जिंकून संजीवन घडवावे. |
| ११ मे | : तुर्कस्थान आणि टर्कीची परिस्थिती पूर्व पदावर यावी. भूकंपामुळे झालेले नुकसान भरुन यावे. |
| १२ मे | : आमच्या शुभवर्तमान मुद्रणालय आणि त्याच्या नित्याच्या कामकाजाकरिता. |
| १३ मे | : आमच्या पाळकांच्या आर्थिक गरजांकरिता. |
| १४ मे | : नहेम्या कॉलेजच्या नव्याने सुरू करण्यात येत असलेल्या बी.टी.एच्. ऑन लाईन अभ्यासक्रम प्रवेशाकरिता पात्र विद्यार्थी मिळावेत. |
| १५ मे | : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षाकरिता **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल**मध्ये प्रवेशाकरिता योग्य विद्यार्थी मिळावेत. |
| १६ मे | : **नहेम्या कॉलेज**च्या २०२३-३४ या शैक्षणिक वर्षाकरिता निवासी आणि सायंकालीन अभ्यासक्रमकरिता विद्यार्थी मिळावेत. |
| १७ मे | : आमच्या संस्थेतील सर्व सहकाऱ्यांनी एकजुटीने आणि एकमनाने सेवा करावी. |
| १८ मे | : आमचे सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी. |

(पान ४ वरुन)

पवित्रतेच्या जीवनाला प्राधान्य देऊन ते सुरू ठेविले. सर्व मंडळ्यामध्ये दररोज प्रार्थना करण्यात येतात. मोठी प्रार्थना केंद्रे उभारण्यात आली आहेत आणि त्यांत दिवस-रात्र प्रार्थना करण्यात येत आहेत. या अखंडीत प्रार्थनांचा सुगंध अखंडीत असा स्वर्गात पोहचत आहे.

येथील देवाच्या सेवकांनी त्यांची पहिली प्रीति, प्रार्थनेची तहान, पावित्रतेचा संस्कार आणि संजीवनाचा प्रभाव विसरले नाहीत आणि त्यांचे त्यांनी सर्व बांजुनी ते सुरक्षित ठेविले. याच कारणामुळे कोरीया हा उत्कृष्ट असा देश बनला आहे. मी दक्षिण कोरीया बद्दल बोलत आहे. देवाचे अनेक सेवक येथून बाहेर पडले आणि ते जगाची उलथा-पालथ करीत आहेत, मी कदाचित असे बोलणे अतिशयोक्ति वाटेल, परंतु ते सत्य आहे.

अशाप्रकारे, मोठे संजीवन घडून येण्यासाठी प्रामाणिक पश्चाताप आणि आग्रही प्रार्थनां आवश्यक आहेत. एका समर्पित अशा देवाच्या सेवकांच्या संघटीत गटाची जे जागतिक संजीवना करिता आग्रहाने प्रार्थना करीतो, याची देखील या संजीवन जपल्या करिता गरज आहे. आपण जर लटपटलो किंवा अडखळलो तर मात्र संजीवन विझून जाईल किंवा थंड पडेल.

### खऱ्या संजीवनाच्या दोन बाजू!

**१) देवाच्या लोकांमधील सजीव संजीवन!**

**२) देवाचे अस्तित्व पुन:स्थापीत होणे.**

### १) देवाच्या लोकांमधील सजीव संजीवन

आग्रही प्रार्थना देवी - अद्भूत संजीवन घडविल. **यास्तव बंधुजनहो, "मी देवाच्या करुणांमुळे तुम्हांस विनवितो की तुम्ही आपल्या शरिरांचा जीवंत, पवित्र व देवाला प्रिय असा यज्ञ करावा.... आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रुपांतर होऊ द्या...**" (रोम १२ : १-२).

हल्ली मंडळ्या आणि ख्रिस्ती संस्थांमधून प्रेषितिय आत्मिक अनुभवांना तिलांजली दिली गेली आहे आणि लबाड - धुर्त गोष्टि सुरू आहेत. वर्तमान दिवसात उपास प्रार्थना - चमत्कर सभात बदलल्या आहेत आणि देशांकरिता संजीवन प्रार्थना सभा पैसा मिळविण्यासाठी होत आहेत. जे लोक देवाने देशातील हिंसाचार, भ्रष्टाचार आणि शाप संपूर्णपणे नष्ट व्हावा या ओझ्याने प्रार्थना सभांमध्ये हजर राहतात, त्या सेवेतील भागीदारांच्या सभा झाल्यात.

आपल्या देशात खरे आत्मिक संजीवन यावे यासाठी सर्व प्रथम देवाच्या लेकरांनी त्यांचे जीवन देवाच्या इच्छेला समर्पित केले पाहिजे आणि मनाचे नवीकरणाने स्वत:त बदल केला पाहिजे.

याच्या विरुद्ध, काहीतरी नवीन करण्याच्या कल्पनेने, आजच्या मंडळ्या लोकांपुढे चुकीच्या गोष्टि ठेवित आहेत आणि त्यांची उद्दीष्टे पूर्ण करण्याकरीता त्यांना सामील करुन मोठे संजीवन घडल्याचे जाहिर करीत आहेत. जो पर्यंत लोकांच्या जीवनात बदल होत नही, त्यांच्या प्रार्थनां, संगीत आणि नृत्य, भरभराट - उत्कर्ष होईल असे संदेश देणे, आकर्षक सभा मंच आणि सेवेबद्दलचे नवीन-नवीन योजन व्यर्थ आहेत. जर एखादी व्यक्ति आजकालच्या प्रसिद्धीत असलेल्या देवाच्या सेवका जवळ गेली, तर तिला त्या सेवकात घृणास्पद असा पैशांचा मोह, गर्व, अंत:करणात स्वार्थ भरलेला ज्याचा दुर्गंध बाहेर पडत आहे, काही जण देव राज्याचा विस्तार-वाढ याचा विचार न करता, 'माझी मंडळी', 'माझी सेवा', 'माझे मिशनरी', 'माझा बगीचा', 'माझी इमारत' इत्यादि असे बोलताना पाहवयास मिळतील. हि प्रवृत्ति गेली पाहिजे आणि देवाला आपण कसे दिसत आहोत याचा विचार केला पाहिजे. देवाचा एक सेवक सेवेत्या नावाखाली दुसऱ्या सेवकाची भेट घेतो आणि एकतर्फी व्यवहार करण्यात बदलून टाकतो, अशावेळी मोठा पेच निर्माण होतो.

(...पान ९ वर)


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | पाळकांचे समुपदेशन | : सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| १८. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १९. | साप्ताहिक शास्त्राभ्यास | : सायंकाळी ६.३० वाजता - बुधवारी |
| २०. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २१. | शिष्यत्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २२. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २३. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २४. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २५. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २६. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २७. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २८. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २९. | सकाळचे मनन | : पहाटे ५ वाजता - दररोज |
| ३०. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३१. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल चेन्नाई पाहिजेत

**१) प्रिन्सिपल**

नहेम्या बायबल कॉलेज करिता

पात्रता: एम.डिव्ह. किंवा एम. टि. एच.

**२) संगणक कर्मचारी**

पात्रता: संगणक आणि टंकलेखनाचे ज्ञान

संपर्क: इमेल: sam@echoofhiscall.org

वॉट्सअप: **+91-98412 71858**

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**


# एको ऑफ हीज कॉलचे मुद्रणालय!

## THE PRINTING PRESS OF ECHO OF HIS CALL!

मी तरुण मुलगा होतो; त्यावेळी १९६९-१९७१ या दोन वर्षात, मी देवाचे सेवक स्वर्गवासी पास्टर एस्. देवदासन यांच्या ‘हेरॉल्ड ऑफ हिज कमींग’ या त्यांच्या मासिकाच्या कार्यालयात आणि मुद्रणालयात एक अतिशय कनिष्ठ व्यक्ति म्हणून काम करीत होतो.

या पाळकांनी मला प्रभुच्या सेवा कार्यातील दु:ख आणि चांगुलपणा याविषयी आणि देवाची सेवा करण्याच्या पद्धती विषयी शिकविले. त्यांनी मला व्यवस्थापकीय आणि प्रशासकिय कार्याविषयी देखील शिकविले. त्याशिवाय मी मिस्टर वेदमणी या त्यांच्या लेखापालांच्या हाताखाली हिशेब ठेवण्याच्या पद्धतीत प्रशिक्षित झालो.

त्यावेळी आमच्या पाळकांनी नवीन मुद्रणालय खरेदी केले. त्यात मिस्टर राज नावाचा केवळ एकच कारागीर होता. मुद्रणालयातील ते छपाई यंत्र (मशीन) अतिशय जुन्या नमुन्याचे होते; आणि ते हाताने चालविण्यात येणारे असे होते. त्याचा दांडा एकदा फिरविल्यास एकच कागद छापता येत होता.





**मॅन्युयल प्रिन्टींग मशीन**

मी जरी काम कठीण होते तरी अतिशय आनंदाने तो दांडा फिरविण्याचे काम करीत असे. मला ते संपूर्ण मासिक छापण्याकरिता ५०,००० वेळा तो दांडा फिरवावा लागत असे. प्रत्येकवेळी दांडा फिरविताना मी प्रभुची स्तुति असो असे बोलत होतो. म्हणजे ५०,००० वेळा तसे बोलत होतो. मी तसे करीत असताना माझे पाळक मला पाहत होते आणि त्यांना उत्तेजन मिळत असे.

त्यांनी मला पालायाम्कोत्ताई येथील ‘न्यु लाईफ’ मासिकाच्या कार्यालयात नेले; आणि मुद्रणालयात मासिक कसे छापण्यात येते ते दाखविले. मी ते जुने मुद्रणालय आणि तेथे खाली बसून कामकरीत असलेले कामगार पाहिले. ते मासिकाचे बंडल करुन पोस्ट ऑफीसात नेत होते. त्यांना हि सर्व कामे करताना पाहून माझ्या मनात मी अशा प्रकरची सेवा सुरू करावी असे आले. त्या दिवसापासून शुभवर्तमान साहित्य मुद्रणालयाच्या कल्पनेने माझ्या मनात प्रवेश केला; आणि मी लोकांकडून त्याविषयीची माहिती मिळवू लागलो.

एकदा, अशा ठिकाणी माझे जाणे झाले जेथे १०० ऑफसेट प्रिंटिंग मशीन एका ओळीत ठेवण्यात आल्या होत्या. त्यांचे मालक देवाचे एक सेवक होते. मी त्यांना मशीनची किंमत विचारली. त्यावर त्यांनी मला असे उत्तर दिले, “हि मशिन केवळ अतिशय श्रीमंत व्यक्तिच खरेदी करू शकते. तुम्ही ती विकत घेऊ शकणार नाही; आणि जर कोणी तुम्हाला ती दान म्हणून दिली, तरी तुम्ही त्याची देखभाल करू शकणार नाही.” ते ऐकून मला अतिशय दु:ख झाले. मी सरळ माझ्या घरी गेलो; आणि जाऊन माझ्या प्रभुला ते संभाषण सांगितले.




देवाने माझी प्रार्थना ऐकली. देवाने मला एक जुनी मशिन दिली. तशाच नमुन्याची मशिन दक्षिण आफ्रिका देशातील 'Bloemfontein' येथील संग्रहालयात ठेवण्यात आलेली आहे. देवाने मला दिलेली मशिन एक प्राचीन मशिन होती. ती चेन्नईमधील ‘वाशेरमेनपेट’ येथील बंधु. संदुरम् यांच्याकडे होती. ते तिचा वापर करीत नसल्यामुळे, त्यांनी स्वस्त किंमतीत मला ती दिली.

त्यानंतर पुढे देवाने मला माझ्या मुद्रणालयात सुधारणा करण्यास मदत केली. आज, देवाने मला एक स्वयंचलीत ऑफसेट प्रिंटिंग मशीन दिली, जी १६ भाषेतील **एको ऑफ हिज कॉल** मासिकाची छपाई करीत आहे. त्यावर आम्ही अनेक भाषामध्ये आत्मिक पुस्तके छापतो व देवाच्या कृपेने जगभरात ती विनामुल्य पाठवितो.




प्रस्तूत प्रिन्टींग ऑफसेट मशीन

या पातळी पर्यंत पोहचण्याकरिता, मला पुष्कळशा खडतर मार्गातून जावे लागले. प्रिय मित्रांनो! तुम्ही देखील खडतर मार्गातून जात आहात कां? प्रभु परमेश्वर तुम्हाला त्याने दिलेली सेवा करण्यास मदत करील. तुम्ही निराश होणार नाही.

**"...डोळ्यांनी पाहिले नाही, कानाने ऐकले नाही व माणसाच्या मनात आले नाही, ते आपणावर प्रीति करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केले आहे."** (१ करिंथ २:९)

************

(पान ६ वरुन...)

## २) देवाचे अस्तित्व पुनः स्थापीत होणे

मागील तीस वर्षांत फार मोठ्या प्रमाणात देवाचे सेवक तयार झाले. त्याच सोबत तितक्याच प्रमाणात सेवा (मिनिस्ट्री) देखील वाढल्या. परंतु चांगल्या उद्देशां ऐवजी, गोंधळ आणि वाईट विचारांतच वाढ झाली! मंडळ्यामध्ये आणि संस्थामध्ये त्यांच्या विशिष्ट समस्येबद्दल अनेक वर्षे प्रार्थना करावी यासाठी पुढे येणारे लोक आहेत. काहीजण आत्मिक समाधान न मिळाल्यामुळे एका मागून एक अशा मंडळ्यांमध्ये भटकत आहेत. ज्या मंडळ्यात जागतिक राजकारणात बदल घडविल्याचे सामर्थ्य आहे; त्या त्यांच्यापुढे थरथरत आहेत.

देवाची इच्छा आहे कि, त्याच्या सेवकांच्या सामर्थ्यशाली संदेशांच्या द्वारे लोकांच्या जीवनात बदल घडून आणि सैतान थरथरू लागावा. परंतु ते सामर्थ्यशाली संदेश दिले जात नाहीत आणि त्यामुळे सेवा मंद झाल्या आहेत कां? करण देवाने त्याची सक्षमता काढून घेतली आहे. हे त्यामागचे सत्य आहे.

त्यामुळे, आपण देवाची समक्षतता कोठे हरवून बसलो आहेत आणि प्रेषितीय अभिषेक आपल्यामधून कोणत्या परिस्थीमुळे किंवा कारणांमुळे काढून घेण्यात आला आहे, त्याविषय आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. मंडळ्यांमध्ये आणि कुटुंबांमध्ये प्रार्थना आणि मध्यस्थिचा आत्मा ओतला गेला पाहिजे. असे जेव्हा घडेल तेव्हा लोक संजीवना करिता आक्रोश करतील. नाश पावणाऱ्या आत्म्यांबद्दल त्यांना दुःख होईल आणि ते कोणताहि प्रकारचा त्याग करण्या पुढे येतील.

संजीवनाचे साक्षीदार होण्याची हीच वेळ आहे. याच एका उद्देशाने देवाने आपल्याला या जगात ठेविले आहे. सर्व निर्जीव कार्ये आणि स्वार्थि सेवा कार्य काढून टाका आणि देवासमीप येऊन महान अशा संजीवनाचे ओझे घेऊन प्रार्थना करा. पायांना विश्रांती देवू नका, पुढे जाण्यास थांबू नका. देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

************

### स्तोत्र १२१ : ७-८

"परमेश्वर सर्व अनिष्टपासून तुझें रक्षण करील. तुझ्या जिवाचें रक्षण करील. परमेश्वर तुझे येणेजाणे आता पासून सर्वकाळ सुरक्षित करील.

## विशेष प्रार्थना विनंत्या

१) **एको ऑफ हिज कॉल** सेवाकार्याला सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या आर्थिक समस्यांत बदल घडावा.

२) सेवेचे दर्शन असणारे लोक देवाने त्याच्या सेवेकरीता पुरवावेत असे समर्पित सेवक आम्हाला आमच्या चेन्नाई कार्यालय, गावातील शाळा, बायबल कॉलेज, शुभवर्तमान मुद्रणालय, मंडळ्या आणि मिशन क्षेत्रांकरिता हवे आहेत.

३) देवाच्या सेवेत अडखळण असलेल्या सर्वांनी पच्छाताप करावा.

४) पाळक स्वत:बाबतच विचार करतात. त्यांनी केवळ स्वत:च्याच प्रगतीचा किंवा वाढीचा विचार न करता, त्यांच्या अधिकारात असणाऱ्यानिधीचा विनियोग ज्या खेड्यांत उपासना मंदिरे नसतील तेथे ती बांधण्यासाठी करावा. देवाच्या एका सेवकाने म्हटले, "जर देवाच्या अनेक सेवकांच्या हातात (अधीकारात) असलेला निधी त्यांनी उपयोगात आणला तर ज्या खेड्यात उपासना मंदिर नाही तेथे ते बांधले तर त्यांचा त्यांना लाभ मिळेल." कृपया या सर्व गोष्टि लक्षात ठेवा, प्रार्थना करा.

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल
### युट्युब

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपाकरुन आमच्या एको ऑफ हिज कॉल युट्युब चॅनल बघा आणि सबस्क्राईब करा. आभार

- संपादक

## OUR BANK DETAILS:

**1. Bank : State Bank of India**

Branch : Triplicane, Chennai-5
Name : S. Sam Selva Raj
A/C No. : 1023 2934 679
IFSC : SBIN 00 00 249
SWIFT CODE : SBI NIN BB 455

**2. Bank : ICICI Bank**

Branch : Anna Salai, Chennai-6
Name : Echo of His Call
A/C No. : 6038 0502 2319
IFSC : ICIC 000 6038

**3. Bank : State Bank of India**
(This Account is for Tax Exemption for Indians only )

Branch : Triplicane, Chennai-5
Name : Echo of His Call Educational Trust
A/C No. : 1023 2923 805
IFSC : SBIN 00 00 249

Google Pay: 98410 71858
PayPal : SAM SELVA RAJ
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th APRIL 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**